# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मराठी अधिविभाग

## MOU

मराठी विभागाच्या वतीने खालील संस्थांच्या सहयोगातून विविध उपक्रम राबविण्यात येतात.

1. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (करार)
2. साहित्य अकादमी, दिल्ली
3. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
4. महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
5. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
6. राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
7. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
8. मराठी विज्ञान परिषद, मुंबई
9. सहापेडिया, नवी दिल्ली
10. भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर
11. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ
12. समाज प्रबोधन पत्रिका
13. दमसा (दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा)
14. आवानओल प्रतिष्ठान, कणकवली
15. सावली केअर सेंटर, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मराठी अधिविभाग

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील अनेक वाङ्मयीन, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांसोबत सामंजस्य करार करुन तसेच सहयोगाने विद्यार्थ्यांसाठी अनेक कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळांचे आयोजन केलेले आहे. तसेच विभागातील प्राध्यापकांनीही अशा विविध संस्थांशी संलग्न राहून कार्य केलेले आहे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि समाज या अनुषंगाने अत्यंत महत्त्वपूर्ण अशा कार्यक्रमांचे आयोजन मराठी विभागात नेहमीच, विविध निमित्ताने होत असते. या सामंजस्य करारांमुळे विभाग व विभागातील विद्यार्थी विविध वाङ्मयीन, सामाजिक तसेच सांस्कृतिक विषयांशी, उपक्रमांशी जोडले गेलेले आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्षरित्या विविध सांस्कृतिक व्यवहाराची ओळख होते. यांतून शिक्षण व समाजातील परस्पर सहसंबंध दृढ होण्यास मदत होते; तसेच विद्यार्थ्यांच्या आकलन जाणिवाही  समृद्ध होतात.

### महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ' ही महाराष्ट्र शासनाने दि. १ डिसेंबर १९८० रोजी स्थापन केलेली संस्था असून, विश्वकोशाच्या द्वारा जगातील विविध ज्ञान मराठीत आणण्यासाठी तसेच विविध विषयाचे उपलब्ध ज्ञान अद्ययावत करण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. या संस्थेने आपला उद्देश व कार्य अधिक परिणामकारक रित्या साध्य करण्यासाठी विविध विद्यापीठांना ज्ञानमंडळाच्याद्वारे सहभागी करुन घेण्यासाठी विविध विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. या योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 'मराठी साहित्य' या विषयाची पालकसंस्था म्हणून ज्ञानमंडळाची जबाबदारी पार पाडत आहे. या सामंजस्य करारानुसार मराठी विभागातील प्रा.डॉ. राजन गवस यांनी 'मराठी साहित्य' विषयाचे समन्वयक म्हणून काम केलेले आहे. तसेच त्यानंतर प्रा. डॉ. रणधीर शिंदे हे दि. २ जून २०१९ पासून आजपर्यंत 'मराठी साहित्य' विषयाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

या काराराअंतर्गत समन्वयक मराठी साहित्यातील विविध विषय, नोंदी निवडून विविध लेखकांकडून लिहून घेतात तसेच त्या नोंदी तज्ज्ञ समितीकडून तपासून घेऊन निश्चित झालेली नोंद विश्वकोश निर्मिती मंडळाकडे पाठवून ती महाराष्ट्र राज्य विश्वकोशाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते.

## साहित्य अकादमी, दिल्ली

भारतीय भाषा व साहित्य यांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारत सरकारने दि. १२ मार्च १९५४ रोजी साहित्य अकादमी या संस्थेची स्थापना केली. या संस्थेकडून भारतातील भाषा व साहित्याच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविले जातात; तसेच भारतीय भाषांमधील विविध साहित्याचे प्रकाशन ही केले जाते. साहित्य अकादमी ही भारत सरकारची राष्ट्रीय पातळीवर स्वायत्तपणे कार्य करणारी संस्था असून ती विविध राज्यांमधूनही कार्यरत आहे. मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी साहित्य अकादमीच्या मराठी भाषा सल्लागार मंडळावर २०१२ ते २०१७ पर्यंत सदस्य म्हणून काम केलेले आहे.

साहित्य अकादमी आणि मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी 'स्वातंत्र्योत्तर वाङमयीन चळवळी आणि स्त्रियांचे प्रश्न' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते.

दि. २८ व २९ जुलै २०१९ रोजी मराठी विभाग, साहित्य अकादमी, दिल्ली आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथप्रदर्शन आणि भारतीय लेखकांवरील लघुपट प्रदर्शन हा कार्यक्रम आयोजित करुन अत्यंत उत्साहात पार पडला.

## नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

नॅशनल बुक ट्रस्ट ही १ ऑगस्ट, १९५७ साली स्थापन झालेली रास्त व वाजवी दरात पुस्तके प्रकाशित करणारी देश पातळीवरील एक महत्त्वाची संस्था आहे. देशभरातील विविध भाषेतून लिहिणाऱ्या, नवनवीन लेखकांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम नेहमीच या संस्थेची वतीने आयोजित केले जातात. नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया यांच्या सहयोगाने मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी 'नवलेखक कार्यशाळा' आयोजित केली होती.

## महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई

महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई, अण्णा भाऊ साठे अध्यासन आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. १ फेब्रुवारी २०२० ते २० फेब्रुवारी २०२० रोजी शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करुन ते यशस्वीरित्या पूर्ण केले. या कार्यशाळेत विविध नवोदित विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. यामध्ये शाहीर व इतर कलाकारांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

विभागातील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी महाराष्ट्र शासनाचा ‘लोककला संकलन प्रकल्प’ यशस्वीपणे पूर्ण केला. महाराष्ट्रातील अनेक लोप पावणाऱ्या पारंपरिक लोककलांचे जतन करण्याच्या उद्देशाने गावोगावी जाऊन या लोककलांचे डिजीटल स्वरूपात संकलन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्प पूर्ण केला.

## महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्र राज्याच्या मराठी साहित्य, कला व संस्कृती क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन विकास व प्रगतीच्या दृष्टीने कार्य होईल या उद्देशाने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची १९ नोव्हेंबर १९६० रोजी स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेने विविध महाविद्यालयांना, विद्यापीठांना सहाय्य करुन मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनेक उपक्रम केलेले आहेत. विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी २०१८ ते २०२० या कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणून काम केले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि मराठी विभागाने दि. १४ ते २८ जानेवारी २०२१ रोजी ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ विविध वाङमयीन कार्यक्रमांनी साजरा केला.

## राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

राज्य मराठी विकास संस्था ही ‘मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास’ या बोधावाक्याला अनुसरून काम करणारी राज्य शासनाची एक संस्था आहे. विविध क्षेत्रात होणार मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व्हावा, तसेच मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया गतिमान व्हावी या उद्देशाने ही संस्था कार्यरत आहे. राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने १९ जानेवारी २०१७ रोजी ‘राज्यस्तरीय मराठी विकिपीडिया : कार्यशाळा’ आयोजित केली होती.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

मसाप अर्थात 'मराठी साहित्य परिषद' या महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्थेची स्थापना दि. २७ मे १९०६ रोजी चौथ्या ग्रंथकार संमेलनात करण्यात आली. या संस्थेकडून विविध वाङमयीन उपक्रम राबविले जातात. या संस्थेच्या 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या नियतकालिकाच्या संपादक मंडळामध्ये मराठी विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे हे २०१६ पासून आजपर्यंत कार्यरत आहेत.

## मराठी विज्ञान परिषद, मुंबई

मराठी विज्ञान परिषद, मुंबई व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६, ७ व ८ मार्च २०१८ रोजी 'मराठी विज्ञान कथा लेखन कार्यशाळा' आयोजित केली होती. ही तीन दिवसीय कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली. यामध्ये यशवंत देशपांडे, माधुरी शानभाग, मोना चिमोटे, शिरीष गोपाळ देशपांडे, सुधा रिसबूड व शिवाजीराव पवार यांना मार्गदर्शक म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी सहभागी विद्यार्थ्यांना विज्ञान कथा लेखनाचे मार्गदर्शन करुन प्रात्यक्षिकही करुन घेतले.

## सहापेडिया, नवी दिल्ली

सहापेडिया ही भारतीय कला, संस्कृती आणि इतिहासाचे जतन करणारी संस्था आहे. भारतीय पारंपरिक, सांस्कृतिक ज्ञानाचा एक सर्वसमावेशक डिजिटल ज्ञानकोश तयार करुन तो लोकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने ही संस्था कार्यरत आहे. सहापेडिया, नवी दिल्ली आणि मराठी विभागाच्या वतीने दि. १५ जानेवारी २०२० रोजी 'कबीरपंथी भजन' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण झाले. महाराष्ट्र आणि येथील वारकरी पंथ तसेच संत कबीर यांच्या तत्त्वज्ञानाचा, पंथाचा व काव्याचा सहसंबंध याची यांनिमित्ताने ओळख झाली.

सहापेडिया, नवी दिल्ली या संस्थेच्या सहयोगाने मराठी विभागात दि. २७, २८ व २९ नोव्हेंबर २०२० रोजी 'भक्ति चळवळ : संशोधन व दस्तऐवजीकरण' या विषयावर आभासी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत निहारिका गुप्ता, कार्तिकेय आणि अक्षय पानसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भक्ती चळवळ आणि त्यातील विविध पंथांचे, पारंपरिक गोष्टींचे, परंपरांचे संशोधन कसे करावे, त्याचे जतन कसे करावे तसेच आधुनिक पद्धतीने त्याचा महितीतपट किंवा इंटर स्वरूपात सादरीकरण कसे करावे याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती व मार्गदर्शन मिळाले.

**भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर**

'भाषा माझी, आपली सर्वांची!' या उद्देशाने १६ नोव्हेंबर २००५ पासून हलकर्णी, चंदगड तसेच महाराष्ट्र-बेळगाव सीमाभागात भाषा व बोलीचा अभ्यास करणारी संस्था म्हणजे भाषाविकास संशोधन संस्था होय. भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर व मराठी, विदेशी भाषा, इंग्रजी, राज्यशास्त्र आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ मार्च २०१९ रोजी शहीद भगतसिंग दिनानिमित्त शहीद भगतसिंग लिखत 'पंजाबच्या भाषा आणि लिपीची समस्या' (भाषांतरे आणि टिपणे : तन्मय केळकर) या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ संपन्न झाला.

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाविद्यालयीन स्तरावरील मराठीचे अध्यापन' या विषयावर दि. २३ मार्च २०१७ रोजी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.

**समाज प्रबोधन पत्रिका**

विवेकनिष्ठा, व्यक्तीस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व लोकशाही ही मूल्यनिष्ठा ठेवून समाज प्रबोधन संस्था १९५९ पासून महाराष्ट्राच्या वैचारिक व सामाजिक क्षेत्रात जागृतीचे कार्य करीत आहे. या संस्थेच्या 'समाज प्रबोधन पत्रिका' या नियतकालिकाच्या संपादक मंडळावर विभागातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे हे २०१० पासून आजपर्यंत काम पहात आहेत. तसेच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी विविध विषयावर संशोधनपर लेखही समाज प्रबोधन पत्रिकेतून लिहीत असतात.

**दमसा (दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा)**

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा ही कोल्हापूर येथे असलेली साहित्य संस्था आहे. ही संस्था २५ मे १९८२ रोजी स्थापन झाली. संस्थेचे कार्यक्षेत्र म्हणजे पश्चिम महाराष्ट्राचे दक्षिणेकडचे सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर हे चार जिल्हे आहेत. या संस्थेमार्फत विविध साहित्य संमेलने, चर्चासत्र आयोजित केली जातात.

## आवानओल प्रतिष्ठान, कणकवली

आवानओल प्रतिष्ठान, कणकवली व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. १४ ऑक्टोबर २०२० रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने 'मराठी कविता : नव्या वाटा' हा नवोदित कवींच्या काव्यवाचनाचा आभासी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या काव्यवाचन कार्यक्रमात महाराष्ट्रातील नवोदित कवींनी आपल्या कविता सादर केल्या. शर्मिष्ठा भोसले, नीलम यादव, कविता ननवरे, मेघराज मेश्राम, वाल्मिकी वाघमारे, कविता शिर्के हे कवी सहभागी होते. या आभासी कार्यक्रमाला मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, आवनओलचे अजय कांडर तसेच विद्यार्थी व महाराष्ट्रातून अनेक रसिक श्रोते उपस्थित होते.

## सावली केअर सेंटर, कोल्हापूर

सावली केअर सेंटर कोल्हापूर व मराठी विभागाने संयुक्तपणे 'आरोग्याची भाषा आणि भाषेचे आरोग्य' या विषयावर दि. ७ मार्च २०१८ रोजी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर, डॉ. आशुतोष दिवाण, उदय कुलकर्णी व सोनाली नवांगुळ हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

❑❑❑